RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६०

दि. २४ जून २०२६, वार : बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी प्रवीण बागडे यांची निवड

**नागपूर/प्रतिनिधी :** पत्रकारिता, सामाजिक प्रबोधन, संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार तसेच वंचित, शोषित आणि बहुजन समाजाच्या न्यायहक्कांसाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ज्येष्ठ पत्रकार, लेखक व सामाजिक विश्लेषक प्रवीण मोरेश्वर बागडे



(नागपूर) यांची ''राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार-२०२६'' साठी निवड करण्यात आली आहे. आंबेडकरी विचारसरणीला वाहिलेल्या दैनिक निळे प्रतीकच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक, पत्रकारिता आणि समाजपरिवर्तनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात येते.

हा पुरस्कार शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर, टी.व्ही. सेंटर, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार आहे. दैनिक निळे प्रतीकचे मुख्य संपादक तथा निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष आयु. रतनकुमार साळवे यांनी ही निवड जाहीर केली. पत्रकारिता, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे संवर्धन आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याच्या कार्याची दखल घेऊन प्रवीण बागडे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रवीण बागडे यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक प्रश्नांवर निर्भीडपणे लेखन करत समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल सामाजिक, साहित्यिक, पत्रकारिता तसेच आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांनी समाधान व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले आहे. राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल प्रवीण बागडे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## प्रकाशकांनी ३० जून पर्यंत वार्षिक विवरणपत्र दाखल करावे, विवरणपत्र दखल न केल्यास दहा हजारांचा दंड

**लातूर/प्रतिनिधी :** प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ अंतर्गत नोंदणीकृत प्रत्येक नियतकालिकाने आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित वार्षिक विवरणपत्र प्रेस सेवा पोर्टल वर ऑनलाइन सादर करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ चे विवरणपत्र सादर न करणाऱ्या प्रकाशकांना ३० जून २०२६ पर्यंतची अखेरची संधी देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे भारत सरकारच्या प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांद्वारे कळविले आहे.

प्रेस आणि नियतकालिक नोंदणी अधिनियम, २०२३ मधील कलम १४(१)(ब) व १४(३) नुसार, वार्षिक विवरणपत्र निर्धारित मुदतीत न भरल्यास संबंधित प्रकाशकावर दंड आकारण्याची तरतूद आहे. पहिल्या चुकीसाठी किमान दहा हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. त्यानंतरच्या प्रत्येक चुकीसाठी दंडाची रक्कम मागील दंडाच्या दुप्पट असेल. मात्र, एकूण दंडाची कमाल मर्यादा दोन लाख रुपये निश्चित करण्यात आली असल्याचे प्रेस रजिस्टार जनरल, नवी दिल्ली यांनी दिलेल्या सूचनांमध्ये नमूद केले आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र अद्याप सादर न केलेल्या प्रकाशकांनी ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाइन दाखल करावे. या मुदतीनंतर विवरणपत्र सादर न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येईल,असेही प्रेस रजिस्टर जनरल, नवी दिल्ली यांनी सूचनांमध्ये नमूद केले आहे.

## लातूर तहसील प्रशासनाची अवैध गौण खनिज वाहतुकीवर कारवाई; हायवा जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** तहसीलदार लातूर श्री. सौदागर तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाने बारा नंबर पाटी परिसरात अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधात धाडसी कारवाई केली. या कारवाईदरम्यान अवैधरित्या मुरूम वाहतूक करणारे हायवा वाहन क्रमांक -२४-८०८० पथकाने पकडले. सदर वाहनाविरुद्ध नियमानुसार पुढील कारवाई करण्यासाठी ते तहसील कार्यालय, लातूर येथे जमा करण्यात आले आहे. या कारवाईत सुजाता हंकारे (नायब तहसीलदार, लातूर) तसेच राहुल माळवदकर (महसूल सहाय्यक) यांनी सक्रिय सहभाग घेत कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी महसूल प्रशासनाकडून अशा कारवाया सातत्याने सुरू असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# महाराष्ट्राचा महा एआय उपक्रम देशात ठरणार अभिनव : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## - शासकीय कामात येणार गती आणि पारदर्शकता - राज्यातील विभागांत लवकरच अंमलबजावणी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या विभागांमधील कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'महा एआय' - प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी 'महाराष्ट्र हब' हा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित देशातील पहिलाच अभिनव उपक्रम विकसित करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लवकरच या उपक्रमाची अंमलबजावणी राज्यातील विविध विभागात होणार असून या माध्यमातून शासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपण्या, अहवाल तयार करणे, शासकीय कामांचे भाषांतर, दस्तऐवजांचे सारांश तसेच शासकीय ज्ञानभांडारातील माहिती शोधणे यांसारखी कामे अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येणार असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे महा एआय प्लॅटफॉर्मबाबत बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता,वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव नवीन सोना, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, महाआयटीच्या संचालक भुवनेश्वरी एस,राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक सपना कपूर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील शासकीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी 'महा एआय' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने महाराष्ट्रासाठी ही प्रणाली विकसित केली असून ती इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य डेटा सेंटरच्या पायाभूत सुविधांवर कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय माहितीचे सार्वभौमत्व, गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित होणार आहे.




सर्व संवेदनशील शासकीय माहिती शासनाच्या स्वतःच्या नियंत्रणाखाली राहणार असून, माहितीची साठवणूक व प्रक्रिया राज्य शासनाच्या सुरक्षित अधोसंरचनेमध्येच केली जाणार आहे. 'महा एआय'' प्रणालीद्वारे अधिकृत पत्रे, ई-मेल, टिपण्या तयार करणे, दस्तऐवजांचे संक्षिप्तीकरण, स्पष्टीकरण व भाषांतर, शासकीय नियम, अधिनियम, शासन निर्णय आणि परिपत्रकांवरील संदर्भाधारित माहिती शोधणे तसेच नैसर्गिक भाषेत अहवाल तयार करणे शक्य होणार आहे. लाभार्थ्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने लाभार्थी पडताळणीची सुविधाही उपलब्ध होणार आहे. सदर प्रणालीमध्ये विविध एआय मॉडेल्सची निवड, प्रतिमा व दस्तऐवज अपलोडची सुविधा उपलब्ध आहे. या प्रणालीमध्ये वापरकर्तानिहाय सुरक्षित लॉगिंग, एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, पदानुसार प्रवेश नियंत्रण यांसारखी सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली आहेत, त्यामुळे शासकीय दस्तऐवज आणि माहितीची गोपनीयता अबाधित राहणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, भविष्यात 'महा एआय'चा वापर सर्व शासकीय विभागांमध्ये एकसमान एआय प्लॅटफॉर्म म्हणून करण्यात येणार आहे. तसेच ई-ऑफिस, आरटीआय, ई-एचआरएमएस, आपले सरकार यांसारख्या विविध ई-शासन प्रणालींशी त्याची जोडणी करून मसुदा तयार करणे, भाषांतर, सारांश, ज्ञानसंकलन आणि लाभार्थी पडताळणी यांसारख्या सुविधा अधिक सक्षम करण्यात येतील.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह व राज्य सूचना माहिती अधिकारी व उपमहासंचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र सपना कपूर यांनी महा एआय प्लॅटफॉर्मबाबत सादरीकरण केले.

# महेश नवमीच्या शोभायात्रेने जिंकली लातूरकरांनी मने !

## लातूर जिल्ह्याच्या विकास - प्रगतीत माहेश्वरी समाजाचे मोठे योगदान : दिलीपराव देशमुख







**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने महेश नवमीचे औचित्य साधून मंगळवारी सायंकाळी काढण्यात आलेल्या भव्य दिव्य शोभायात्रेने लातूरकरांनी मने जिंकली. शोभायात्रेच्या शुभारंभ प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना सहकार महर्षी - माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्याच्या विकास आणि प्रगतीत माहेश्र्वरी समाजाचे मोठे योगदान असल्याचे मत व्यक्त केले.

लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री महेश नवमीचे औचित्य साधून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी शहरातील छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील श्री गौरीशंकर मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेचा प्रारंभ दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, आबासाहेब पाटील, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा, सचिव रमेश बियाणी, व्यापारी धर्मशाळेचे अध्यक्ष रमेश राठी, लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट , हुकूमचंद कलंत्री, धनराज भुतडा, ईश्र्वरप्रसाद डागा , ईश्र्वर बाहेती यांसह मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश कासट यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी तीन वर्षांपूर्वी लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने साजरी केली गेलेली महेश नवमी देशभरात अव्वल ठरल्याचे आवर्जून सांगितले. समाजाचे संगठन मजबूत झाल्यामुळे या सोहळ्यात आता हजारोंच्या संख्येने समाज बांधव - भगिनी स्वयंस्फूर्तीने सहभागी होत आहेत. आपला समाज स्वाभिमानी - कष्टकरी असून लातूरचा ९० टक्के व्यापार माहेश्र्वरी समाज चालवतो असे सांगून आपल्या समाजाच्या एकूण २७ ट्रस्ट असून ट्रस्टकडे कोणीही स्वतःहून मदत मागायला पुढे येत नाही, एवढा आपला समाज स्वाभिमानी असल्याचे उदगारही त्यांनी काढले.

यावेळी आपले विचार व्यक्त करताना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी माहेश्र्वरी समाज बांधवांना महेश नवमीच्या शुभेच्छा दिल्या. सहिष्णुता, सचोटी, संयम, दानत या सर्व बाबी माहेश्र्वरी समाजाकडे मुबलक असल्याचे सांगून सातत्याने कार्यमग्न राहणारा हा समाज असल्याचे त्यांनी सांगितले. व्यवसायाची शिस्त कशी पाळावी ? हे या समाजाकडून शिकावे असे सांगून माहेश्र्वरी सभेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. मार्केट यार्डापासून निघालेल्या या शोभायात्रेत सहभागी झालेल्या माहेश्र्वरी ढोलताशा पथकाच्या कामगिरीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. या शोभायात्रेचे संयोजक ईश्र्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, नंदकिशोर लोया, राहुल लोया, ईश्र्वर चांडक, दिनेश गिल्डा हे होते. माहेश्र्वरी समाजातील स्त्री - पुरुष हजारोंच्या संख्येने पारंपरिक वेशभूषेत शोभायात्रेत सहभागी झाले होते. मार्केट यार्डापासून निघालेली ही शोभायात्रा गुल मार्केट, हनुमान चौक, सुभाष चौक, दयाराम रोड मार्गे गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशालेत विसर्जित झाली. शोभायात्रेतील आकर्षक देखावे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनीही शोभायात्रा पाहून समाधान व्यक्त केले.

गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालयात ही शोभायात्रा विसर्जित झाल्यानंतर त्याठिकाणी तोष्णीवाल परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्नेहभोजनाचा लाभ हजारो समाज बांधवांनी घेतला.

## शालार्थ आयडी घोटाळ्याच्या तपासात धक्कादायक माहिती उघड

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षण विभागाला हादरवून सोडणाऱ्या शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. या प्रकरणात काही संस्थाचालक आणि शिक्षण विभागातील अधिकारी तपास यंत्रणांच्या रडारवर आले आहेत. जवळपास ९०० संशयितांविरुद्ध गुन्हे दाखल असलेल्या या प्रकरणाची व्याप्ती संपूर्ण राज्यभर पसरली आहे. दरम्यान आता याच नाशिक शालार्थ आयडी घोटाळ्याच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. एकाच जावक क्रमांकाचा वापर करून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने बोगस शालार्थ आयडी तयार करण्यात आल्याचे या तपासात उघड झाले आहे.

नाशिक शालार्थ आयडी घोटाळ्याच्या तपासादरम्यान उपलब्ध कागदपत्रांमध्ये विरोधाभास दिसून आला. त्यामुळे आता अधिकृत नोंदींमध्ये फेरफार झाल्याचा संशय आणखी बळावला आहे. धक्कादायक म्हणजे, एकाच अधिकृत आदेशाखाली भिन्न नावांचे संच नोंदविण्यात आल्याचे दिसून आले आहे. सरकार पक्षाच्या वतीने ही बाब न्यायालयात स्पष्ट करण्यात आली. त्या अनुषंगाने सहायक पोलिस आयुक्त संदीप मिटके तपास करीत असून या प्रकरणात लवकरच मोठी कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

राज्य शिक्षण मंडळाचा शालार्थ आयडी घोटाळा तत्कालीन अध्यक्ष नितीन उपासनी, तत्कालीन शिक्षणाधिकारी संशयित नितीन बच्छाव , भाऊसाहेब चव्हाण यांच्यासह संशयितांचा समावेश आहे. बोगस शालार्थ आयडी कोणाच्या मंजुरीने तयार झाले, याचा तपास पहिल्या टप्प्यात झाला असला तरी या प्रकरणात अजून काही संशयितांची चौकशी केली जाण्याची शक्यता पोलिस सत्रांनी व्यक्त केली आहे. या प्रकारामुळे प्रशासकीय प्रक्रियेच्या पारदर्शकतेतर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असन संबंधित जबाबदारांवर कारवाईची मागणी होत आहे.

# विनोद भाऊ खटके यांच्या वाढदिवसानिमित्त चाकूर येथील रक्तदान शिबीरात ८६ रक्तदात्यांनी केले रक्तदान १३२ जणांची नेत्ररोग तपासणी

**चाकुर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद किणीकर यांच्या नेतृत्वाखाली सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या वाढदिवसानिमित्त चाकुर येथे भव्य रक्तदान शिबिर आणि नेत्ररोग तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला विनोद भाऊ खटके यांचा वाढदिवस केक कापून आणि विनोद भाऊ यांचा भव्य सत्कार करण्यात आला. शिबिराचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ८६ रक्तदात्यांनी रक्तदान करून विनोद भाऊंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. नेत्ररोग तपासणी शिबिरामध्ये १३२



रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि त्यामध्ये १७ रुग्ण मोतीबिंदू ऑपरेशन साठी लातूरला पाठवण्याचे ठरले अशा पद्धतीने विनोद भाऊ खटके यांचा वाढदिवस जनसेवा दिवस म्हणून साजरा करत असताना लातूर जिल्ह्यातील रुग्णांना रक्तपुरवठा करता यावा तसेच चाकूर तालुक्यातील वृद्ध लोकांची दृष्टी सुधारावी यासाठी अशा पद्धतीच्या शिबिराच्या आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शरद किनीकर आणि तालुकाध्यक्ष अजय वाघमारे यांनी दिली.

या शिबिराला प्रमुख अतिथी म्हणून संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन भाऊ मस्के मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे संपर्कप्रमुख आनंद जाधव विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे शहराध्यक्ष असद भाई शेख कामगार आघाडी अध्यक्ष गौस शेख यांची उपस्थिती होती.

यावेळी सर्व मान्यवरांचा तालुका शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. रक्तसंकलनासाठी भालचंद्र ब्लड बँकेला पाचारण करण्यात आले होते तसेच नेत्ररोग शिबिरासाठी विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातील नेत्ररोग विभागातील पथक शिबिरा स्थळी उपस्थित होते यावेळी चाकुर तालुका शाखेच्या वतीने भालचंद्र ब्लड बँकेच्या तसेच नेत्ररोग विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष शरद किनीकर मार्गदर्शक माधव कांबळे तालुका अध्यक्ष अजय वाघमारे सिद्धार्थ किनिकर शहर अध्यक्ष विक्रम कांबळे सचिव गजानन कांबळे ता उपाध्यक्ष केतन कांबळे, शादुल शेख, इस्माईल पठाण, मिलिंद कांबळे, संगम डोंगरे,शैलेश महालिंगे, रणवीर कांबळे, गजानन गायकवाड, समाधान गायकवाड, जयचंद कांबळे, रोहित कांबळे, नरेंद्र गोलावार, अनुज कांबळे, महादेव गायकवाड, प्रशांत कांबळे व आदी जण उपस्थित होते.

संपादकीय...

## अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक त्रुटींकडे पाहण्याची गरज

देशाच्या समष्टी-आर्थिक आणि सामरिक सार्वभौमत्वासाठी आत्मनिर्भरता ही आवश्यक असून, संरचनात्मक बदलांची हीच योग्य वेळ आहे. जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या छायेत असताना, भारताचा असलेला सात टक्क्यांहून अधिक विकासदर निश्चितच लक्षवेधी आहे. मात्र, या सांख्यिकीय घोडदौडीच्या पलीकडे जाऊन अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक त्रुटींकडे पाहण्याची गरज नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका सविस्तर अहवालाने अधोरेखित केली आहे. निव्वळ स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या आकड्यांवर समाधान मानण्याऐवजी, अर्थव्यवस्थेच्या पायाभूत रचनेतील परावलंबित्व कमी करण्यावर आता धोरणात्मक लक्ष केंद्रित करावे लागेल. संरक्षण, ऊर्जा, तंत्रज्ञान आणि विदेशी भांडवल या चार क्षेत्रांतील अवलंबित्व हे आपल्या अर्थव्यवस्थेपुढील मोठे प्रणालीगत संकट आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील भू-राजकीय धक्क्यांपासून देशाला वाचवायचे असेल, तर तात्पुरत्या मलमपट्ट्या न करता, आमूलाग्र आणि धाडसी धोरणात्मक बदल करणे, ही आता काळाची गरज बनली आहे. हाच या ताज्या अहवालाच्या विश्लेषणाचा मुख्य गाभा आहे. भारताच्या भांडवली बाजाराने गेल्या काही वर्षांत अभूतपूर्व उंची गाठली असली, तरी या बाजारावरील विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांचे वर्चस्व ही दुधारी तलवार ठरत आहे. जागतिक व्याजदरांमध्ये किंवा भू-राजकीय स्थितीत थोडा बदल झाला, तरी हे विदेशी गुंतवणूकदार तातडीने अब्जावधी रुपयांचे भांडवली पलायन करतात. या अस्थिर भांडवलामुळे देशांतर्गत शेअर बाजार आणि रुपयाचे मूल्य सातत्याने अस्थिरतेच्या छायेत राहते. या ताज्या अहवालाने याच वित्तीय धोक्याकडे लक्ष वेधले आहे. सुदैवाने, गेल्या काही वर्षांत म्युच्युअल फंड आणि 'एसआयपी'च्या माध्यमातून भारतीय किरकोळ गुंतवणूकदारांनी देशांतर्गत भांडवलाचा एक भक्कम पाया तयार केला आहे. विदेशी गुंतवणूकदारांच्या विक्रीच्या दबावाला भारतीय गुंतवणूकदारांनी दिलेले उत्तर, हा देशाच्या वाढत्या आर्थिक परिपक्वतेचा पुरावा आहे. विदेशी भांडवलावर अवलंबून राहण्याऐवजी, देशात थेट विदेशी गुंतवणुकीला आकृष्ट करणे, हे अधिक शाश्वत धोरण आहे. 'एफडीआय' फक्त विदेशी चलन आणते, असे नाही; तर त्यासोबत प्रगत तंत्रज्ञान, जागतिक व्यवस्थापन कौशल्य आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती घेऊन येते. भारतासारख्या युवा लोकसंख्या असलेल्या देशात लोकसंख्येचा लाभांश मिळवायचा असेल, तर दरवर्षी लाखो नवीन रोजगार निर्माण करणे अनिवार्य आहे. सेवा क्षेत्रावर अवलंबून हा प्रश्न सुटणार नाही. उत्पादन क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक वाढल्यास देशांतर्गत पुरवठा साखळी मजबूत होईल आणि तळागाळातील तरुणांना रोजगाराच्या शाश्वत संधी उपलब्ध होतील. त्यामुळे आयातीवर खर्च होणारा पैसा देशातच राहील आणि रोजगाराभिमुख आर्थिक विकासाला खर्या अर्थाने गती मिळेल. संरक्षण क्षेत्रातील परावलंबित्व म्हणजे निव्वळ विदेशी चलनावर पडणारा ताण राहिला नसून, तो राष्ट्रीय सुरक्षेतील मोठा धोका ठरत आहे. भारत हा जगातील प्रमुख शस्त्र आयातदार देश राहिला आहे. रशिया, इस्रायल किंवा अमेरिकेकडून होणार्या शस्त्रआयातीवर अब्जावधी डॉलर्स खर्ची पडतात. या अहवालानुसार, ही स्थिती दीर्घकालीन अर्थकारणासाठी आणि सामरिक सुरक्षेसाठी अत्यंत हानिकारक आहे. युद्ध किंवा जागतिक तणावाच्या काळात शस्त्रास्त्रांची पुरवठा साखळी खंडित झाल्यास, देशासमोर गंभीर पेचप्रसंग उभा राहू शकतो. विद्यमान सरकारने 'मेक इन इंडिया'अंतर्गत सुरू केलेले संरक्षण उत्पादनांचे आयात पर्यायीकरण ही योग्य दिशेने टाकलेली पावले आहेत. संरक्षण उत्पादनांची परिसंस्था देशातच उभी राहिल्यास हजारो सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना मिळेल. आपण आयातीकडून निर्यातीकडे वळू, तेव्हाच भारताची सामरिक स्वायत्तता खर्या अर्थाने प्रस्थापित होईल. भारताच्या अर्थव्यवस्थेपुढील सर्वाधिक गंभीर आर्थिक आव्हान ऊर्जाक्षेत्रातील परावलंबित्वाचे आहे. आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांहून अधिक कच्चे तेल विदेशातून आयात करावे लागत असल्याने, देशाची चालू खात्यातील तूट नेहमीच दबावाखाली असते. जागतिक बाजारातील तेलाच्या किमतीतील किरकोळ वाढही भारतात आयातित चलनवाढ निर्माण करते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी भारताला अपारंपरिक ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि ई-मोबिलिटीकडे वेगाने संक्रमण करावे लागेल. यासोबतच, आधुनिक अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या तंत्रज्ञान क्षेत्रातील पाश्चिमात्य आणि चिनी मक्तेदारी मोडून काढणे अपरिहार्य आहे. सेमीकंडटर चिप्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या क्रिटिकल तंत्रज्ञानासाठी तैवान किंवा अमेरिकेवर विसंबून राहणे धोक्याचे आहे. देशांतर्गत सेमीकंडटर परिसंस्था उभी केल्याशिवाय भविष्यातील डिजिटल क्रांतीचे नेतृत्व भारताला करता येणार नाही. या संपूर्ण आत्मनिर्भरतेच्या प्रवासात संशोधन आणि विकास या क्षेत्रातील गुंतवणुकीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विकसित देशांच्या तुलनेत भारताचा 'आर अॅण्ड डी'वरील खर्च 'जीडीपी'च्या ०.७ टक्क्यांच्या आसपास आहे, जो अत्यंत चिंतेचा विषय आहे. जोपर्यंत आपण स्वतःचे बौद्धिक संपदा हक्क आणि पेटंट्स मोठ्या प्रमाणावर निर्माण करत नाही, तोपर्यंत जागतिक मूल्य साखळीत आपण केवळ असेम्बलर म्हणूनच मर्यादित राहू. महासत्ता बनायचे असेल, तर तंत्रज्ञानाची आयात करून चालणार नाही, तर त्या तंत्रज्ञानाचे मूळ उत्पादक आणि विकसक बनावे लागेल. यासाठी शैक्षणिक संस्था, खासगी उद्योग आणि सरकार यांनी एकत्र येऊन नावीन्यपूर्ण संशोधनाला चालना देणारी एक भक्कम परिसंस्था निर्माण करणे, हे अत्यंत गरजेचे आहे. एका ताज्या अहवालात मांडलेले हे निष्कर्ष भारताच्या आर्थिक सार्वभौमत्वाचा वास्तववादी आणि स्पष्ट असा रोडमॅप आहे. विदेशी भांडवल, संरक्षण, ऊर्जा आणि तंत्रज्ञान या चारही आघाड्यांवर आयातीची कोंडी फोडल्याशिवाय भारताचा आत्मनिर्भरतेचा संकल्प हा पूर्णत्वास जाणारा नाही. विस्कळीत होत चाललेल्या जागतिक पुरवठा साखळ्यांच्या आणि 'चीन प्लस वन'च्या या काळात, बाहेरील तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःचे सक्षम उत्पादन-पर्यावरण उभे करणे, हाच शाश्वत पर्याय आहे. ही संरचनात्मक सुधारणा वेळेत अमलात आणली, तर भारत जागतिक भू-अर्थकारणात खर्या अर्थाने एक स्वायत्त महासत्ता म्हणून उदयास येईल. आगामी दशकात, जागतिक अर्थव्यवस्थेत स्वतःचे नियम बनवणारा देश म्हणून भारताला जागतिक पटलावर आपली ओळख निर्माण करावी लागेल. यासाठी धोरणात्मक घोषणा पुरेशा नसून, प्रशासकीय पातळीवर त्यांच्या कठोर अंमलबजावणीची नितांत आवश्यकता आहे. देशातील प्रत्येक नवे धोरण आयात कमी आणि देशांतर्गत मूल्यवर्धन या एकाच तत्त्वावर केंद्रित होईल, तेव्हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया हा मजबूत बनेल. अशा वेळी बाहेरील कोणतेही भू-राजकीय संकट भारतीय अर्थव्यवस्थेला धक्का देणारे ठरू शकणार नाही. तसेच भारत ही एक परिपूर्ण, स्वावलंबी आणि अभेद्य अर्थव्यवस्था

# काँग्रेसचा विचार सर्वांना सोबत घेवून जावू शकतो

## धाराशिवमध्ये माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे प्रतिपादन

## लोकनेते विलासराव देशमुख एक्सलंन्ट सेंटरचे थाटात उद्‌घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** लोकनेते विलासराव देशमुख यांच्यासारख्या नेतृत्वाची आज देशाला गरज असून धाराशिवसारख्या त्यांच्या कर्मभूमीत असलेल्या शहरात विलासराव देशमुख सेंटर सुरू होत आहे, ही आनंदाची बाब आहे. काँग्रेस हा केवळ एक राजकीय पक्ष नसून तो एक संवैधानिक विचार आहे. गांधी-नेहरू ते इंदिरा गांधी यांच्यापर्यंतच्या नेत्यांनी हा विचार प्राणपणाने जपला. काँग्रेस ही आता पक्षाबरोबरच एक विचाराची चळवळ झाली आहे. तशी ही वैचारिक गंगा आहे. काँग्रेसचा विचार सर्वांना पुढे घेवून जाऊ शकतो, तो पुढे आपण सर्वांना घेऊन जाण्यासाठी प्रयत्न चालू ठेवू. असे प्रतिपादन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले ते धाराशिव येथील परिमल मंगल कार्यालयात रविवारी सायंकाळी (दि.२१) विलासराव देशमुख एक्सलंन्ट सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलासराव देशमुख सेंटरचे संस्थापक उल्हास पवार हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पुणे लोकमत आवृत्तीचे संपादक संजय आवटे हे होते.

**विलासराव देशमुख यांची धाराशिव कर्मभूमी**

पुढे बोलताना सहकार महर्षी दिलीपराव देशमुख म्हणाले की, धाराशिव जिल्हा हा विलासराव देशमुख यांची कर्मभूमी असलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यात त्यांच्या नावाने हे सेंटर सुरू होत आहे, त्यामुळे खरोखर मनापासून आनंद होत आहे. या सेंटरमध्ये काम करणारे विविध क्षेत्रातील मंडळी आहे, त्यामुळे विलासराव हे केवळ आपले नव्हते तर ते सर्वांचेच होते हे स्पष्ट होते. उल्हास पवार आज देशात जेथे जातात तिथे विलासरावांची आठवण निघते. उल्हासदादांनी विलासरावाबद्दल बरेच काम केले आहे, आणि ते आणखी करत आहेत. यापुर्वी विचाराचे धन संतांनी केले मात्र आज संत सापडत नाहीत खया अर्थाने आता संत जन्म घेतील का नाही हा संशय आहे. धाराशिव येथे विलासराव देशमुख सेंटर सुरु होत आहे, आता या सेंटरला विलासराव देशमुख एक्सलंन्ट सेंटर असे स्वरूप द्यावे असेही त्यांनी यावेळी सुचवले.




विलासराव देशमुख यांच्या विचाराची आज देशाला गरज आहे. गांधी-नेहरू ते इंदिरा गांधी यांच्यापर्यंतच्या नेत्यांनी हा विचार प्राणपणाने जपला. तोच विलावरावांनही जपला. त्यामुळे काँग्रेस ही आता पक्षाबरोबरच विचाराची मोठी चळवळ झाली आहे. काँग्रेसचा विचार हा सर्वांना बांधून ठेवण्यासाठी आहे, तो पुढे आपण चालू ठेवू विलासराव जाऊन आज १४ वर्षे झाली. परंतु त्यांचे विचार आजही आहेत, त्यांना जाऊन जसजसे जास्त दिवस जातील तसतसे त्यांचे विचार जास्त रुजले जात आहेत. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात विलासराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी विलासराव देशमुख सेंटरच्या वतीने ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, विश्वास शिंदे, शरद सस्ते, आप्पासाहेब पाटील, माधवराव कुतवळ, रणजीतसिंह पाटील, दिलीपसिंह देशमुख, रावसाहेब पाटील सास्तूरकर यांचा व युवा साहित्य अकादमी नामांकित लेखक केतन पुरी आणि अभिनेता रोहित कोकाटे यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रशांत पाटील यांनी केले. यावेळी त्यांनी विलासराव देशमुख साहेबांच्या नावाने धाराशिव जिल्ह्यात काहीतरी चांगले सुरू झाले पाहिजे. त्याच्या कार्यकाळात धाराशिव जिल्ह्यात अनेक विकास कामे झाली आहेत, त्यांचा धाराशिवशी ऋणानुबंध चांगला राहिला आहे, त्यांनी लातूरला देत असताना धाराशिवलाही भरभरून दिले आहे. त्यामध्ये कृष्णा मराठवाड्याचे २१ टीएमसी पाणी असो रेल्वेसाठीची प्रयत्न असतील अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाने हे सेंटर सुरू करत असून यामध्ये विधायक काम सुरू करत आहोत. या सेंटरच्या माध्यमातून आरोग्य शैक्षणिक समाजोपयोगी काम करणार आहोत. या सेंटरमध्ये सर्वच क्षेत्रातील मान्यवर आहेत. सर्वांसाठी काम करणार असून आपण सर्वांनी त्या साथ द्यावी, आजचे गढूळ झालेले राजकारण पाहता आपण विलासराव देशमुख यांचे विचार घेऊन त्यांच्या विचाराचे काम करू असे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रविंद्र केसकर यांनी केले तर आभार अॅड. अनिकेत देशमुख यांनी मानले. कार्यक्रमासाठी अग्निवेश शिंदे, अॅड. राज कुलकर्णी, प्रा. सोमनाथ लांडगे, सुधीर सस्ते, प्रा. रवी निंबाळकर, प्रा. अजित शिंदे, डॉ. सायम रझवी, डॉ. सुधीर शिंदे, सुनील बडूरकर, शशिकांत वैराळे आदी सदस्यांनी परिश्रम घेतले. यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील लातूर जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव लातूर जिल्हा काँग्रेसचे समन्वयक सचिन दाताळ यांच्या सह धाराशिव शहरातील विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विलासराव देशमुख यांच्यासारख्या सुजन नेतृत्वाची आज गरज : माजी आमदार उल्हास पवार**

यावेळी बोलताना विलासराव देशमुख सेंटरचे संस्थापक उल्हास पवार म्हणाले की, हे सेंटर म्हणजे विलासराव देशमुख यांनी केलेले विविध क्षेत्रातील कार्य आजच्या वर्तमानमध्ये चिंतन करणे होय. मी विलासराव देशमुख यांच्यासोबत विद्यार्थी दशापासून होतो. त्यामुळे त्यांचे माझे संबंध चांगले होते. सामाजिक जाण कशी असते हे त्यांनी चांगले जाणले होते.हे महाराष्ट्राच्या फार कमी लोकांना आकलन होते. विलासराव देशमुख हे प्रत्येकाचे फोन घ्यायचे हे त्यांनी एका लहान चार वर्षाच्या मुलीच्या उदाहरणासह सांगितले. वैयक्तिक पातळीवर कोणावरही ते टीका करत नव्हते. आणि टीका केली तर ते कळू देत नव्हते. असे बोलण्याचे कौशल्य त्यांच्यामध्ये होते. त्यामुळे आज जे समाजामध्ये घडतंय त्याची उकल होण्यासाठी एक सेंटर सुरू होतंय चांगली बाब आहे. लोकशाही, समता टिकवण्यासाठी त्यांच्या सुजन नेतृत्वाची गरज आहे. ध्येय बोली, शब्द बोली त्यांच्याकडे होती. सभागृह कसं आपल्या ताब्यात घ्यायचे ते त्यांना जमलं होतं. त्यामुळे त्यांच्या आज विचाराची महाराष्ट्राला गरज आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

**विलासरावांचा वारसा पुढे घेवून गेले पाहिजे : संजय आवटे यांचे प्रतिपादन**

नेहरुंना संस्थात्मक काम उभे केले पाहिजे हे महत्व कळाले होते. त्यामुळे देशात अनेक बदल घडले. विलासराव देशमुख यांची ज्या काळात खया अर्थाने गरज होती त्यावेळी ते गेले. आज त्यांची गरज होती. आता केवळ त्यांना श्रध्दांजली वाहून चालणार नाही त्यांचा वारसा पुढे घेवून गेले पाहिजे. त्यानंतर खया अर्थाने बदल घडणार आहे हे निश्चित आहे. विलासरावांचे विचार नवीन पिडीला माहिती पाहिजेत. आज तुमच्या माझ्या हातातले राजकारण निसटून गेले आहे. हा देश सर्वसामान्यांचा आहे. आज तुमच्या हातातले सामर्थ काढून घेतले जात आहे. सर्वसामान्य मानसाची ताकद राहिली पाहिजे. सर्वसामान्य माणसाच्या हातात सत्ता राहिली पाहिजे. विलासराव मातीत उगवले आणि त्यांनी आकाशाला गवसणी घातली. दिलीपराव ते आज सजवत आहेत. सर्वसामान्याच्या हातून आज सर्व निघून जात आहे. गांधी, नेहरु, आंबेडकर यांच्या सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू जोपर्यंत मानला जाणार नाही तोपर्यंत देशातील परिस्थिती विचित्र राहणार आहे. तरुणामध्ये आज नको ते विष पेरले जात आहे. त्यासाठी आपणाला त्यांच्यापर्यंत जावे लागेल, त्यांना करिअरच्या वाटा दाखवायला हव्यात, आज ते होत नाही. आज जातीय उन्माद वाढवून त्यांना अराजकीय करायचे असे प्रयत्न चालू आहेत. त्यामुळे विलासरावांचे विचार तरुण मुलांचा आयकॉन होवू शकतात. त्यासाठी विलासरावांचे उत्तम चरित्र यायला हवे, तरुण मुला-मुलींना घडविले पाहिजे. त्यासाठी त्यांना राजकीय प्रशिक्षणाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# सत्ताधारी पक्ष एकनिष्ठ आणि स्वच्छ विचारसरणीचे आहे असे म्हटल्या जाते; तर फोडाफोडीचे राजकारण कशाला?

सध्याच्या परिस्थितीत देशासह राज्यात पक्ष फोडा आणि राज करा असा फार्मुला सुरू झालेला दिसून येतो.कारण पुढील संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ८५० खासदारांच्या विधेयकाला मंजुरी मिळावी यासाठी राज्यसभेत व लोकसभेत खासदारांची संख्या अपुरी पडत आहे.याच उद्देशाने सरकारने पक्ष फोडा आणि राज करा अशी रणनीती आखल्याचे स्पष्ट दिसून येते.कारण सरकारला कल्पना आहे की, देशातील ७५ टक्के पेक्षा जास्त लोकप्रतिनिधीवर भ्रष्टाचाराचे किंवा अन्य गुन्हेगारीच्या आरोपाने लिप्त आहेत.अशा सर्वच खासदारांवर सरकारची नजर आहे.अशा खासदारांना ईडी किंवा अन्य सरकारी यंत्रणेचा धाक दाखवून सत्ताधारी पक्ष आपल्या पक्षात किंवा वेगळा गट तयार करून प्रत्येक विरोधी पक्षात फूट पाडण्याचे दबावतंत्र सुरू आहे आणि हे काम सक्सेस सुध्दा होत आहे. त्याचप्रमाणे पक्ष सोडणारे लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी म्हणतात की आम्ही सत्तेत नसल्याने सरकार आमच्या क्षेत्राचा फंड पुरेसा देत नाही त्यामुळे आम्ही सत्ताधारी पक्षात किंवा एनडीएमध्ये किंवा महायुतीत प्रवेश केला आहे किंवा करीत आहोत.काही लोकप्रतिनिधींजवळ भ्रष्टाचाराच्या माध्यमातून वाममार्गाने कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आहे त्यावर कोणतीही कारवाई होवू नये म्हणून एनडीए मध्ये किंवा महायुतीत प्रवेश केल्याचे दिसून येते आणि काही लोकप्रतिनिधी करोडोंची देवाणघेवाण करून सत्तेकडे वळतांना दिसतात.ही बाब देशाच्या १४० कोटी जनतेला चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्याचप्रमाणे अनेक लोकप्रतिनिधीं स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षांतर करून नैतिकता, बांधीलकी आणि पक्षाबद्दलची निष्ठा गहाण ठेवून सत्तेकडे वळल्याचे दिसून येते आणि एनडीएमध्ये किंवा महायुतीत फुटुन जाणारे ७५ टक्के लोकप्रतिनिधी हे कॉग्रेसच्या विचारसरणीचे आहेत, कॉग्रेसची विचारसरणी एनडीएला किंवा भाजपाला कधीच पटली नाही मग सरकारने या ७५ टक्के लोकप्रतिनिधींना आपल्या जवळ का केले असाही प्रश्न उपस्थित होतो!भाजपा पुर्वीही कॉग्रेसला वाईट समजायची आणि आजही समजते एवढे सर्व असतांना फोडाफोडीचे राजकारण करून सरकारला कॉग्रेस विचारसरणीचे लोक कसे काय चालतात? आजही सरकार महत्वाचे मुद्दे बाजूला सारून नेहरू-गांधी यांच्यावर चिखलफेक करून वारंवार देशातील जनतेला सांगतात की कॉग्रेसने गेल्या ६० वर्षांत काहीच केले नाही ही बाब कितपत योग्य म्हणावी!देशाने पक्ष-विपक्षाचा काळ पहाला यात अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी,व्ही. पी. सिंह, पी.व्ही.नहसिंहराव, मनमोहनसिंग, चंद्रशेखर,राजीव गांधी इत्यादी अनेक विभुतींच्या काळात पक्ष-विपक्ष सामंजस्याने कार्य करायचे व एकमेकांचे आचार-विचार आदानप्रदान करायचे.परंतु सध्याच्या परिस्थितीत सरकार विरोधकांच्या कोणत्याही बाबी ऐकण्यास तयार नसल्याचे दिसून येते. ही लोकशाहीला दृष्टीकोणातुन धोक्याची घंटा म्हणावी लागेल. कारण विरोधी पक्ष फुटुन एनडीएमध्ये गेला ते सरकारला चालते आणि दुधासारखे स्वच्छ होतात.परंतु विरोधकांनी उचलले प्रश्र्न चालत नाही ही कसली लोकशाही म्हणावी!ही अत्यंत गंभीर बाब म्हणावी लागेल. पुर्वी रेल्वे, विमान वाहतूक, संरक्षण, अर्थ ,इत्यादी अनेक खात्यातमध्ये जर काही चुकीच्या घटना घडल्या किंवा दुर्घटना झाल्या तर संबंधित विभागाचे मंत्री नैतिक जबाबदारी स्वीकारून स्वतःहुन राजीनामा द्यायचे किंवा जनतेचा रोष पाहुन राजीनामा द्यायचे. परंतु सध्याच्या परिस्थितीत देशात नीट पेपर लिक प्रकरण मोठ्या प्रमाणात गाजले यात आतापर्यंत अंदाजे २० पेक्षा जास्त विद्यार्थींनी आत्महत्या केल्या तरीही शिक्षण मंत्र्यांनी आपली नैतिक जबाबदारी स्वीकारून अजुनपर्यंत राजीनामा दिलेला नाही. सरकारचे म्हणने आहे की, राजीनामा ही पद्धत आमच्यात नाही ही कसली लोकशाही! सोन्याचे भाव आसमानाला टेकले,महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही, आरोग्य सुविधा दिवसेंदिवस ढासळत आहे ह्या सर्वच महत्वपूर्ण गोष्टी सरकारच्या डोळ्यासमोर आहे.परंतु यावरून लक्ष भटकवीण्यासाठी देशात मंदिर-मज्जीद,हिंदू-मूस्लीम वाद समोर करून १४० कोटी जनतेची सरकार दिशाभूल करीत असल्याचे दिसून येते. आणि ही सत्य परिस्थिती आहे.देशात अनेक ज्वलंत व गंभीर समस्या आहेत बेरोजगारी, कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शैक्षणिक समस्या,वाढता भ्रष्टाचार, अत्याचार,वाढत्या जंगलतोडीमुळे अलनिनोची गंभीर समस्या,पिण्याच्या पाण्याची समस्या, आरोग्य,करोडोंचे घोटाळे करून अनेक पुंजीपतीनी विदेशात पलायन केले त्याकडे सरकारचे दुर्लक्ष आहे. अशा अनेक गंभीर समस्या १४० कोटी जनतेपुढे उभ्या आहेत.तरीही देशाच्या भोळ्याभाबड्या जनतेला मंदिर-मज्जीद नावाचे भुत घालून या सर्वच समस्या बाजूला सारून सत्तेत आपली पकड मजबूत करण्यासाठी देशात सरकारकडून फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. सरकारची कट्टर विरोधक ममता बॅनर्जी त्यांच्या पक्षाचे आचार-विचार सरकारला कधीच पटले नाही; परंतु फोडाफोडीच्या राजकारणातुन काही लोकप्रतिनिधी (खासदार) आपल्याकडे करून घेतले ते सरकारला १०० टक्के चालले ही कुठली नितीमत्ता म्हणावी! सध्याच्या परिस्थितीत देशात खुला राजकीय बाजार मांडल्याचा दिसून येतो.जनुकाय लोकशाही संपुष्टात आली की काय असे चित्र दिसत आहे.कारण सत्तेच्या लोभापोटी अनेक दिग्गज लोकप्रतिनिधी पक्षांतर करून सत्तेकडे वळतांना दिसतात म्हणजेच विकल्या जात आहे ह्या सर्वच बाबी लोकप्रतिनिधींकडुन कलंकित करणाऱ्या आहेत. एकेकाळी प्रत्येक राजकीय पक्षांमध्ये विचारसरणी,पक्षांची बांधीलकी,पक्षासोबत एकनिष्ठपणा रहायची परंतु अलीकडच्या काळात राजकीय वर्तुळात घोडेबाजाराला मोठा ऊत आल्याचे स्पष्ट दिसून येते. लोकप्रतिनिधी सरेआम विकल्या जात आहे आणि जो सत्ताधारी पक्ष ज्या विरोधकांवर भ्रष्टाचाराचे मोठमोठे आरोप लावायचे आणि जेलमध्ये टाकण्याची भाषा करायचे त्या सर्वांनाच सरकार भ्रष्टाचाराबद्दलची क्लीन चिट देवून आपल्या पक्षात सहभागी करून घेत आहेत ही तर लोकशाहीची खुली थट्टा म्हणावी लागेल.आचार-विचारामध्ये विरोधाभास असु शकतो आणि असायला पाहिजे.परंतु १४० कोटी जनतेसमोर धडाल लोकप्रतिनिधी विकल्या जात आहे ही १४० कोटी जनतेची थट्टाच म्हणावी लागेल. आजचा राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षाची नैतिकता, बांधीलकी, विचारसरणी विसरून सत्तेकडे पलायन करीत आहे हा लोकशाहीला मोठा धक्काच म्हणावा लागेल.सत्ताधारी पक्षाने आपली पकड मजबूत करण्यासाठी जनुकाय लोकशाही विरूद्ध बंड पुकारले की काय असे वाटत आहे.कारण सध्याच्या सत्ताधाऱ्यांना विरोधकांची विचारसरणी कधीच पटली नाही आणि पटणार सुध्दा नाही.कारण सरकारला मजबूत विरोधी पक्ष नकोच! याकरिता विरोधीपक्ष संपुष्टात आणण्यासाठी सरकारने फोडाफोडीचे राजकारण सुरू केले आहे आणि त्याच पध्दतीने सरकारकडून गेल्या काही वर्षांपासून देशात फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे आणि यात त्यांना मोठ्या प्रमाणात यश सुध्दा मिळत आहे.यामागचा सरकारचा एकच उद्देश असावा तो म्हणजे विरोधक संपुष्टात आणने.गेल्या १२ वर्षे अगोदर विरोधकांचा मानसन्मान व्हायचा.परंतु आता तोडा-फोडा राज करा अशी परिस्थिती सर्वत्र दिसून येत आहे.आज देशात सत्ताधाऱ्यांसोबत शेकडो भ्रष्टाचारी आहेत.एकेकाळी सत्ताधारी पक्ष ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप लावायचे तेच भ्रष्टाचारी आज सत्तेत सहभागी होवून जबाबदार पदावर विराजमान आहेत आणि दुधासारखे स्वच्छ झालेले दिसतात याला कोणती लोकशाही म्हणावी! जय हिंद.



लेखक

**रमेश कृष्णराव लांजेवार**

( स्वतंत्र पत्रकार )

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# विलास घुले हत्ये प्रकरणी केज तालुक्यात जन अक्रोश! हत्येच्या निषेधार्थ केज शहर दिवसभर कडकडीत बंद!

- केज शहरातील छ. शिवाजी महाराज चौकात २ वाजेपर्यंत रास्ता रोको
- घटनेतील मुख्य आरोपी अटक केल्याशिवाय अंत्यविधी करणार नसल्याचा ग्रामस्थ आणि नातेवाईकांचा ठाम निर्धार!
- घटनेला चार दिवस उलटूनही अंत्यविधी नाही.;रात्री उशिरापर्यंत मृतदेह पोलीस स्टेशनच्या दारात






**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील टाकळी येथील विलास घुले निर्घृण हत्येच्या निषेधार्थ काल केज शहर कडकडीत बंद करण्यात आले.तसेच शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी १० वाजेपासून ते दुपारी २ वाजेपर्यंत रास्ता रोको आंदोलन सुरू होते. सदरील घटनेच्या निषेधार्थ छत्रपती शिवाजी महाराज चौक व टाकळी फाटा येथे चार ते पाच वेळा रस्ता रोको आंदोलन व ठिय्या आंदोलन करण्यात आलेले आहे.

केज तालुक्यातील टाकळी येथील विलास घुले यांच्या खुन प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा द्यावी, अॅट्रॉसिटी अॅक्ट अनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा. यासह विविध मागण्यासाठी काल दि २३ जुन मंगळवार रोजी केज शहर कडकडीत बंद ठेवून छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी १० वाजेपासून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन दूपारी २ वाजेपर्यंत सुरु होते. यावेळी मोर्चातआलेल्या महिलांचा आक्रोश पहावयास मिळत होता यावेळी त्यांची एकच मागणी होती. आरोपींना फाशी द्या. अशा विविध मागण्यासाठी केज शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्ता रोको करण्यात आला. यावेळी शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनकर्ते मुख्य आरोपीसह सहआरोपी व इतर आरोपींना जोपर्यंत अटक होत नाही. तोपर्यंत हे आंदोलन सुरू राहणार आहे. या भूमिकेवर ठाम आहेत. विलास घुले यांचा उपचार दरम्यान रविवार रोजी मृत्यू झाला होता.

परंतु अद्यापही त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आलेले नाहीत. केज शहर बंद व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील रस्ता रोको आंदोलनामध्ये व्यापारी, विविध संघटना, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शहरातील नागरिक, टाकळी ग्रामस्थ, महिलासह नातेवाईक, मित्रपरिवार सहभागी होते. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी सुरू असल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले आहे.मात्र जोपर्यंत मुख्य आरोपी अटक होत नाही. तोपर्यंत आम्ही विलास घुले यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करणार नाहीत.अशी ठाम भुमिका ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी घेतल्याने मंगळवारी रात्री उशिरापर्यंत मृतदेह पोलीस स्टेशनच्या प्रांगणात ठेवून आंदोलन सुरू असुन या ठिकाणी हाजोरोंच्या संख्येने जमलेला जनसमुदाय कमी न होता तो वाढत चाललेला असल्याचे पहावयास मिळत आहे.

## ठाणे महापालिकेतर्फे २० जुलै, २०२६ रोजी परिमंडळ लोकशाही दिनाचे आयोजन, दि. ०६ जुलै , २०२६ पर्यंत निवेदन सादर करण्याचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी :** नागरिकांच्या वैयक्तिक तक्रारींचा निपटारा तातडीने होण्यासाठी तालुकास्तरिय लोकशाही दिनाच्या धर्तीवर, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी परिमंडळ स्तरावरही लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार, सोमवार, २० जुलै, २०२६ रोजी परिमंडळ लोकशाही दिन होणार आहे. या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी आपली निवेदने ०६ जुलै, पर्यंत सादर करण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपली निवेदने पुढील ठिकाणी सादर करावीत.

परिमंडळ १ – (कळवा, मुंब्रा, दिवा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, कळवा प्रभाग समिती कार्यालय, कळवा

परिमंडळ २ – (नौपाडा, वागळे प्रभाग समिती अंतर्गत, उपायुक्त कार्यालय, नौपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

परिमंडळ ३ – (उथळसर, वर्तकनगर, लोकमान्य. सावरकरनगर, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत) उपायुक्त कार्यालय, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती कार्यालय, ठाणे (प.)

नागरिकांनी प्रथमतः परिमंडळ लोकशाही दिनात अर्ज दाखल करावेत. परिमंडळ लोकशाही दिनात दाखल केलेल्या तक्रारींवर कोणतीही कार्यवाही झाली नसल्यास नागरिक महापालिका लोकशाही दिनामध्ये नियमानुसार १५ दिवस आधी आपली निवेदने सादर करू शकतील. नागरिकांनी परिमंडळ लोकशाही दिनासाठी आपली निवेदने संबंधित परिमंडळ कार्यालयात सादर करावीत.

## महाराष्ट्र एमएसएमई परिषद व पुरस्कारासाठी नोंदणी करण्याचे महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या वतीने जागतिक एमएसएमई दिनानिमित्त २७ जून २०२६ रोजी वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात 'महाराष्ट्र चडचए परिषद व चडचए पुरस्कार २०२६' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० या वेळेत होणाऱ्या या परिषदेसाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्रातील उद्योजकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'संकल्पातून सिद्धीकडे - From Commitment to -chievement' ही यंदाच्या परिषदेची संकल्पना असून राज्यभरातील २,५०० हून अधिक चडचए उद्योजक, वित्तीय संस्था, उद्योगतज्ज्ञ, गुंतवणूकदार तसेच आंतरराष्ट्रीय प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. निर्यातवृद्धी, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल परिवर्तन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, शाश्र्वत औद्योगिक विकास, वित्तपुरवठा आणि महिला उद्योजकता यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर विविध चर्चासत्रांचे आयोजनही करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या परिषदेदरम्यान महाराष्ट्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उद्योगांचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र चडचए पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये कारागीर व हस्तकला, नेक्स्टजेन MSME, डिजिटल व AI उत्कृष्टता, सेवा, उत्पादन, हरित उद्योग, महिला उद्योजक, निर्यात आणि चॅम्पियन चडचए अशा नऊ श्रेणींचा समावेश आहे. चॅम्पियन चडचए पुरस्कार वगळता इतर सर्व श्रेणींमध्ये 'एक्सलन्स' आणि 'अचिव्हर्स' या दोन उपश्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या पुरस्कारांद्वारे राज्यातील नाविन्यपूर्ण, तंत्रज्ञानाभिमुख, निर्यातक्षम आणि प्रगत चडचए उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. परिषदेसाठी सर्व चडचए उद्योजकांना https://mahamsmeawards.in/summit/ या वेबसाईटवर मोफत नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून जास्तीत जास्त उद्योजकांनी नोंदणी करून सहभाग नोंदवावा. तसेच MSSIDC g§Ho$VñWi https://mssidc.maharashtra.gov.in/home/inde तसेच ७७१००००९४४ / ७७१००००९५४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांनी केले आहे.

## अवैध पार्सल वाहतूक करणाऱ्या खासगी बस चालकांवर परवाना निलंबनाची कारवाई करणार - परिवहन मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात खासगी प्रवासी बसेस चालक मालकांनी बसमधून कुरिअर पार्सल अथवा अवैध माल वाहतूक केल्यास त्यांच्यावर परवाना निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितले. सदस्य शंकर जगताप यांनी विधानसभेत याविषयी प्रश्न उपस्थित केला होता.

या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव, सुनील प्रभू आणि सिद्धार्थ शितोळे यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला. मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, राज्यात मालवाहतूक करणाऱ्या खासगी प्रवासी बसेस संवर्गातील सर्व वाहनांची वायू वेग पथकामार्फत नियमित तपासणी करुन दोषींवर कारवाई केली जाते. मात्र, यापुढे वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी वाहन चालक आणि मालकांवर थेट मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ८६ नुसार कारवाई करण्यात येणार येणार आहे.

# ३५० वर्षांपूर्वी शिवरायांनी दाखवलेला 'घरवापसी' चा मार्ग आज देशासाठी आवश्यक – सच्चिदानंद आहेर



**लातूर/प्रतिनिधी :**नेतोजी पालकर यांच्या हिंदू धर्मातील पुनर्प्रवेशाच्या ऐतिहासिक घटनेला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कल्चरल स्टडी अँड रिसर्च सेंटर व शहरातील विविध हिंदुत्ववादी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

'छत्रपती शिवाजी महाराजांचा धर्म विषयक दृष्टिकोन' या विषयावर शिवशंभू विचार मंच, पुणेचे सच्चिदानंद आहेर यांनी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात आहेर यांनी इतिहासाच्या विद्रोपीकरणावर टीका करत अनेक प्रचलित दाव्यांना आव्हान दिले. सध्या देशातील धर्मांतराच्या समस्यांवर शिवरायांची 'घरवापसी' हीच प्रभावी उपाययोजना आहे, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी नेतोजी पालकर यांच्या पुनर्प्रवेशाच्या घटनेसह शिवरायांच्या धर्मसंरक्षण व स्वराज्य स्थापनेच्या कार्याचा ऐतिहासिक संदर्भांसह आढावा घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात ७० टक्क्यांहून अधिक मुस्लिम सैनिक होते, हा दावा ऐतिहासिक पुराव्यांशी सुसंगत नसल्याचे सांगत त्यांनी महाराजांच्या सेवेत बारा पेक्षा जास्त मुस्लिम व्यक्तींचाच सहभाग नसल्याचा दावा केला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ब्राह्मणांनी विरोध केला, या मतालाही समकालीन पुरावे उपलब्ध नसल्याचे त्यांनी नमूद केले. काशीचे विद्वान गागाभट्ट यांच्या हस्ते वैदिक पद्धतीने राज्याभिषेक पार पडल्याचा उल्लेख करत आहेर यांनी शिवकालीन इतिहासातील विविध घटनांवर आपली भूमिका मांडली. मुघल आक्रमणे, मंदिरांवरील हल्ले, हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि धर्मसंरक्षण यांसंदर्भातील ऐतिहासिक उदाहरणांचाही त्यांनी उल्लेख केला. कार्यक्रमास ड. जोगेंद्रसिंह चव्हाण यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. इंजि.मनोज सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात १९ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी नेतोजी पालकर यांचा सनातन हिंदू धर्मात पुनर्प्रवेश घडवून आणल्याच्या ऐतिहासिक घटनेचे महत्त्व विषद केले तसेच या दिनानिमित्त समाजप्रबोधन आणि इतिहास जागृतीसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. अध्यक्षीय मनोगत डॉ. व्यंकट कोलपुके यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन नामदेव व्यंजने यांनी, तर आभार प्रदर्शनात वीर योद्धा संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत रांजणकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिवप्रेमी, नागरिक, आयोजक, आणि उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास व विचार समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय कांबळे, लक्ष्मीकांत कुलकर्णी, आनंद अग्रवाल, राजेंद्र बिराजदार, दिलीपचंद चोपडा आदींनी परिश्रम घेतले.

नेतोजी पालकर कोण होते ?

नेतोजी पालकर हे स्वराज्याचे सरसेनापती होते तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यातील एक पराक्रमी सरदार व प्रति शिवाजी म्हणून ओळखले जात. इतिहासातील नोंदींनुसार, त्यांचे धर्मांतर झाल्यानंतर पुन्हा हिंदू धर्मात पुनर्प्रवेश घडवून आणण्यात आला. या घटनेला सामाजिक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून विशेष महत्त्व असल्याचे अनेक अभ्यासक मानतात. याच घटनेच्या स्मरणार्थ लातूरमध्ये व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

## ६४ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सवाच्या विभागीय पारितोषिक वितरण सोहळ्यात रंगकर्मींचा होणार सन्मान

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ६४ वा महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव विभागीय पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार, ३० जून २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यात ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा, प्राथमिक फेरी, २२ वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा, प्राथमिक फेरी; तसेच प्रथम मराठी एकांकिका स्पर्धा, प्राथमिक फेरीतील पारितोषिक विजेत्या कलाकारांचा गौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य नाट्य महोत्सव हा राज्याच्या समृद्ध आणि वैभवशाली रंगभूमी परंपरेचा गौरव करणारा महत्त्वपूर्ण सांस्कृतिक उपक्रम आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांतील नाट्य संस्था, कलाकार, दिग्दर्शक, लेखक आणि तंत्रज्ञ यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध होऊन मराठी नाट्य परंपरेच्या जतन व संवर्धनास चालना मिळत आहे.

नाट्यकला ही समाजातील विविध भावना, विचार आणि सामाजिक वास्तवाचे प्रभावी चित्रण करणारे माध्यम असून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग आहे. हौशी नाट्य, बालनाट्य आणि एकांकिका या माध्यमातून नवोदित कलाकारांना आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळत असून राज्यातील नाट्य चळवळीला नवी ऊर्जा प्राप्त होत आहे.

या पारितोषिक वितरण समारंभामध्ये अभिनय, दिग्दर्शन, लेखन, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत आणि विविध तांत्रिक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलाकार, बालकलाकार आणि नाट्य संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे. या गौरवामुळे कलाकारांच्या सर्जनशील कार्याला प्रोत्साहन मिळून नाट्य क्षेत्रात उत्कृष्टतेचा नवा आदर्श निर्माण होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्राची समृद्ध नाट्यपरंपरा जपणाऱ्या आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचविणाऱ्या या महोत्सवामुळे रंगभूमीवरील नव्या प्रयोगांना व नवोदित कलावंतांना प्रोत्साहन मिळत आहे. विविध विभागांमधून निवड झालेल्या कलाकारांच्या कलात्मक प्रवासाचा गौरव हा या सोहळ्याच्या माध्यमातून केला जाणार आहे.

हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे, अभिजात कला, लोककला आणि थोर कलावंतांचे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित करण्यात येणारे राज्य नाट्य महोत्सव, विविध स्पर्धा आणि पारितोषिक वितरण सोहळे हे कलाकारांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहेत. अशा उपक्रमांमुळे राज्यातील नाट्य संस्कृती अधिक समृद्ध आणि व्यापक होत आहे.

# माळेगाव येथे नैसर्गिक शेती शाळेचे आयोजन




**केज/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानांतर्गत माळेगाव येथे नैसर्गिक शेती शाळेचे आयोजन करण्यात आले. शेतकऱ्यांना विषमुक्त, पर्यावरणपूरक व शाश्वत शेतीकडे वळविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नैसर्गिक शेती शाळेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना रासायनिक खत व कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करून उत्पादन खर्चात बचत करणे, जमिनीचे आरोग्य सुधारणे, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविणे, हिरवळीच्या खतांचा वापर, पिकांची फेरपालट आणि जमिनीची सुपीकता वाढविणे हा आहे. या शाळेमध्ये शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतावर प्रशिक्षण देण्यात येत असून नैसर्गिक शेतीतील विविध तंत्रज्ञानाची माहिती दिली जात आहे.

कार्यक्रमात जीवामृत, घनामृत, बीजामृत, निमास्त्र, दशपर्णी अर्क, निबोळी अर्क यांसारख्या जैविक निविष्ठांची निर्मिती व वापर याबाबत प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. तसेच जैविक निविष्ठांचा वापर करून बीजप्रक्रिया करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांच्या संकल्पनेतून आणि प्रकल्प उपसंचालक सूरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुक्यात विविध खरीप पिकांसाठी नैसर्गिक शेती शाळा आयोजित करण्यात येत आहेत. तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांच्या नियोजनातून माळेगाव येथे सोयाबीन पिकावरील नैसर्गिक शेती शाळा घेण्यात आली. या शेती शाळेसाठी २५ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून सहभागी शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मार्फत पीक प्रात्यक्षिकासाठी सोयाबीन बियाणे, बीजप्रक्रिया संच तसेच बीबीएफ तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी अनुदान देण्यात येत आहे.

यावेळी सोयाबीन बियाण्यास ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची प्रति किलो बियाण्यास ४ ते ५ ग्रॅम प्रमाणात बीजप्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तसेच महाजैविक रायझोबियम, पीएसबी आणि केएमबी या तीन घटकांचा समावेश असलेल्या जैविक जिवाणू संघाचा १० किलो बियाण्यास १०० मिली प्रमाणात वापर करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमास आत्माचे योगेश पाटील, सहाय्यक कृषी अधिकारी कमलाकर राऊत तसेच कालिदास गव्हाणे, यशवंत दोडके, शरद दोडके, बालाजी गव्हाणे, आशामती लोकरे, ज्योती लोकरे, गोविंद दोडके, बळीराम लोकरे, दीपक दोडके आणि कृषिभूषण शेतकरी गटाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गतिरोधकावर स्कूटी आदळल्याने महिलेचा मृत्यू; वाहतूक नियमांचे पालन आणि हेल्मेटचा वापर जीवनरक्षक

**लातूर/प्रतिनिधी :** तुळजापूर-औसा मार्गावरील उजणी येथील पुलाजवळ झालेल्या दुचाकी अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी भादा पोलीस ठाण्यात निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१८ जून रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास अंजली गणेश नकाते (रा. मंगळवेढा, जि. सोलापूर) या ज्यूपीटर स्कूटी (क्र. चक २४ उउ ९८७६) वर मागे बसून प्रवास करत होत्या. त्यावेळी चालक सचिन सुग्रीव यादव (रा. चांडेश्र्वर, ता. जि. लातूर) याने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालविल्याने उजणी येथील पुलाजवळील गतिरोधकावर स्कूटी आदळली. या धडकेत अंजली नकाते या दुचाकीवरून खाली पडल्या व त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांनी हेल्मेट परिधान केलेले नव्हते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी हेल्मेटचा वापर केला असता तर त्यांचा जीव वाचू शकला असता.

या घटनेप्रकरणी नागनाथ दगडू बळके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भादा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १२६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १०६(१), २८१, १२५(अ) व १२५(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस अमलदार कांबळे करीत आहेत.

दुचाकी चालविताना तसेच मागे बसलेल्या व्यक्तीनेही मानांकित हेल्मेटचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक अपघातांमध्ये डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे मृत्यू ओढवतात. हेल्मेटचा वापर केल्यास अशा दुखापतींची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.तसेच वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवणे, रस्त्यावरील गतिरोधक, वळणे व पुलांजवळ विशेष काळजी घेणे, वाहतूक नियमांचे पालन करणे आणि सुरक्षित अंतर राखणे ही प्रत्येक वाहनचालकाची जबाबदारी आहे. काही क्षणांचा निष्काळजीपणा संपूर्ण कुटुंबासाठी दुःखद ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी स्वतःच्या व इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

**मुंबई/प्रतिनिधी** : आदिवासी विकास विभाग, अपर आयुक्त, ठाणे विभागाअंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प मुंबई, उपनगरात आदिवासी मुलांचे एक व आदिवासी मुलींचे एक अशी दोन शासकीय वसतिगृह कार्यरत आहेत. या वसतिगृहात अनुसुचित जमातीच्या प्रवर्गातील रिक्त असलेल्या जागांवर २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश देण्यासाठी स्वयंम पोर्टल सुरू करण्यात आले असून वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी, मुंबई यांनी केले आहे.

२०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षाकरिता मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मुला-मुलींच्या कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय तसेच व्यावसायिक , बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम, बी.ए. बी कॉम, बी.एस. सी, पदवीका, पदवी आणि पदवीनंतरचे पदव्युत्तर पदवी, पदविका इत्यादी अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी आनलाईन प्रवेश अर्ज https://swayam.mahaonline.gov.in या पोर्टलवर केल्यानंतर रिक्त जागांवर निकषानुसार प्रवेश देण्यात येईल.

त्यानुसार मुंबई शहर व मुंबई उपनगरातील, अनुसूचित जमातीच्या मुला/मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यानी https://swayam.mahaonline.gov.in पोर्टल लिंकचा वापर करून अर्ज भरावे, काही अडचणी उद्भवल्यास स्थानिक गृहपाल अथवा प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधून प्रवेश अर्ज भरावेत असे प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

## गोंदिया जिल्ह्यातील कृषी विकासाच्या सर्व प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश- कृषिमंत्री भरणे

**मुंबई/प्रतिनिधी** : गोंदिया जिल्ह्यात नवीन शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करणे, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते आणि आधुनिक कृषी सुविधा उपलब्ध करून देण्याबराबरच गोंदिया जिल्ह्यातील कृषी विकासाच्या सर्व प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज दिले.

गोंदिया जिल्ह्यातील नवीन शासकीय कृषी महाविद्यालयाला मंजुरी देण्याबाबत मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलत होते. गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग आणि कृषी आयुक्त सूरज मांढरे बैठकीला उपस्थित होते.

मंत्री भरणे म्हणाले की, कृषी विभागाच्या जमीन वापराचे धोरण ठरवावे लागेल. गोंदिया येथे नवीन शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या स्तरावर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच करंजा येथील तालुका बियाणे गुणन केंद्राच्या परिसरात विविध पिकांचे प्रात्यक्षिक प्लॉट विकसित करून पुढील काळात कृषी उद्यान उभारण्याची योजना आहे. करंजा येथील कृषी विभागाच्या जागेवर विविध कार्यालये, प्रयोगशाळा व शेतकरी प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक इमारतींच्या बांधकामाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करण्यात आला आहे. जमिनीच्या मोजणीची प्रक्रिया सुरू आहे. नागपूर जिल्ह्यातील कृषी विभागाच्या तीन प्रमुख प्रक्षेत्रांभोवती संरक्षणात्मक कुंपण उभारण्याचा प्रस्ताव विभागीय कृषी सहसंचालकांकडे सादर करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

मंत्री भरणे म्हणाले की, कृषी विभागामार्फत यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत आतापर्यंत २ हजार ७४७ लाभार्थ्यांना २६.५७ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. उर्वरित लाभार्थ्यांच्या सुमारे १३.६९ कोटी रुपयांच्या अनुदान मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कामकाजासाठी आवश्यक वाहनांची उपलब्धता; तसेच सिमकार्ड, मोबाईल, टॅब आणि लॅपटॉप वितरणासंदर्भातील प्रलंबित बाबींचा आढावाही बैठकीत घेण्यात आला.

# महानगरपालिकेच्या वतीने एकल महिला दिवस संपन्न

## शहरातील एकल महिलांनी मनपा योजनेचा लाभ घ्यावा मनपाचे आवाहन






**लातूर/प्रतिनिधी :** शासनाकडून राज्याचे एकल महिला धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे यासाठी लातूर शहर महानगरपालिका महिला बालकल्याण समिती व दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त मानसी मडम, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे , विरोधी पक्ष नेते देविदास काळे व इतर सर्व सन्माननीय सदस्य यांच्या नियोजन व मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त वसुधा फड यांच्या सुचनेनुसार २३ जुन रोजी भालचंद्र ब्लड बँक, लातूर येथे'' एकल महिला दिवस'' संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे हस्ते क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमासाठी प्रास्ताविक उपायुक्त वसुधा फड यांनी केले व सभागृह नेते विजयकुमार साबदे, विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, साऊ एकल महिला समितीच्या सविता कुलकर्णी हे उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमामध्ये मनपा आरोग्य विभागाच्या वतीने महिलांचे आयुष्यमान कार्ड काढणे, महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी उपस्थित महिलांना महिला बचत गट, बँकेकडून अल्प व्याज दराने बचत गटांना व फेरीवाले यांना कर्ज, रमाई घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्यमान कार्ड, मनपा मालमत्तावर महिलांचे नाव लावणे, तहसील कार्यालयाच्या श्रावणबाळ योजना, निराधार योजना इ. योजनाची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समुदाय संघटक विरेंद्र सातपुते, समूह संसाधन व्यक्ती लोमावती मुळे, नीता भालेकर , घटना सोनकांबळे, अनिता पवार, शीतल गोरे, ज्योती सोनकांबळे, सुमन जाधव, संगीता गव्हाणे, सोनाली जाधव, अविनाश बिराजदार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहर अभियान व्यवस्थापक लक्ष्मण जाधव यांनी केले ते आभार शहर अभियान व्यवस्थापक नितीन सुरवसे यांनी मानले.

# वादळ वाऱ्याने निकम कुटुंबीयांचा संसार उद्ध्वस्त

## आमदार रमेशआप्पा कराड यांनी संपूर्ण साहित्य देऊन आधार दिला

प्रतिनिधी/मराठवाडा रिपोर्टर

**लातूर :** अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन लातूर ग्रामीणच्या भादा सर्कल मधील मौजे वानवडा येथील अल्पभूधारक शेतकरी काशिनाथ सिद्धू निकम यांचे संपूर्ण घर आणि घरालगत असलेल्या व्यवसायाचे संपूर्ण नुकसान होऊन निकम कुटुंबीय उध्वस्त झाल्याने लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी तात्काळ सदर कुटुंबीयास संसार उपयोगी साहित्यासह सर्व प्रकारची मदत केली.




अद्यापही मृगाचा पाऊस झाला नाही सर्वजण पावसाची वाट पाहत असतानाच शनिवारी अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन अनेकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. लातूर ग्रामीण मतदार संघात असलेल्या भादा सर्कलमधील मौजे वानवडा येथे झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि वादळ वाऱ्यामुळे अल्पभूधारक शेतकरी काशिनाथ सिद्धू निकम यांचे घरासह घराच्या परिसरात थाटलेल्या किराणा दुकान, पानटपरी आणि आरो प्लांट या व्यवसायाचे मोठे नुकसान झाले. अत्यंत गरीब असलेल्या निकम कुटुंबीयांनी कष्टातून छोटे-मोठे उद्योग व्यवसाय सुरू करून आपली उपजिविका भागवत असतानाच अचानक झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे घरावरील संपूर्ण पत्र्याचे शेड उखडून गेले. साईडच्या भिंती जमीन दोस्त झाल्याने अनेक वस्तूची मोडतोड झाली. अवकाळी पावसाने अन्नधान्य, कपडे, अंथरून पांघरून भिजून गले. संसार उपयोगी भांडीकुंडीसह सर्व प्रकारच्या वस्तू आणि साहित्याची दयनीय अवस्था निर्माण झाली तर किराणा दुकानासह पानटपरी बरोबरच अत्यंत मेहनतीतून आणि कष्टातून उभारलेला आरो प्लांट (शुद्ध पाणीपुरवठा) छोटासा व्यवसाय उध्वस्त झाला.

या नैसर्गिक आपत्तीत उघड्यावर आलेल्या निकम कुटुंबीयांना लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी शनिवारी मोठा आधार दिला. भाजपाच्या लातूर येथील संवाद कार्यालयात कदम कुटुंबीयातील सुमनबाई काशिनाथ निकम व त्यांचा मुलगा बळीराम निकम यांना आ. रमेशआप्पा कराड यांनी संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडीकुंडी व इतर साहित्यसह दैनंदिन वापराचे कपडे, अंथरून पांघरून यासह तात्काळ लागणारे अन्नधान्य देऊन मोठा आधार दिला.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, रेणापूर तालुका संगायो अध्यक्ष सतिश आंबेकर, वानवडा येथील सरपंच फुलचंद अंधारे, उपसरपंच दीपक काळे, लिंबराज सोमवंशी, राजेंद्र घोडके, नितीन अंधारे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती. आ. रमेशआप्पा कराड यांनी तातडीने मदत देऊन मोठा आधार दिल्याबद्दल निकम कुटुंबीयांनी यावेळी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.

## प्रत्येक गावात वेदर स्टेशन बसवण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवणार - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे



**मुंबई/प्रतिनिधी** : फळपीक विमा योजनेतील शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची अचूक भरपाई मिळवून देण्यासाठी राज्यातील प्रत्येक गावात 'वेदर स्टेशन' बसवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी केंद्र शासनाकडे लवकरच प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील हवामान आधारित फळपीक विमा योजनेतील अनियमितता, शेतकऱ्यांना न मिळालेली नुकसानभरपाई आणि प्रलंबित तक्रारींबाबत मंत्रालयात एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत कृषिमंत्री बोलत होते. या बैठकीला आमदार मनीषा चौधरी, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, विमा कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

डहाणू आणि बोईसर येथील शेतकऱ्यांनी विम्याचा हप्ता भरूनही त्यांची नोंदणी पूर्ण झाली नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी जिल्हाधिकारी पालघर यांनी करण्याचे निर्देश कृषिमंत्र्यांनी दिले.प्रत्येक गावात वेदर स्टेशन उभारण्यासाठी शासन आग्रही आहे. गावागावात हवामान केंद्र झाल्यास, निसर्गाच्या लहरीपणामुळे प्रत्यक्ष झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचा आकडा आणि विम्याचे निकष यांची तंतोतंत जुळवणी करणे शक्य होईल, ज्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान टळेल असेही कृषीमंत्री भरणे म्हणाले.

विमा कंपन्या, बँका आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपापसातील समन्वय वाढवून प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत. कोणताही पात्र शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे कडक निर्देशही कृषी मंत्री भरणे यांनी यावेळी दिले.

## नामांकित इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळेत प्रवेशासाठी ६ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी** : २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेमध्ये प्रवेशासाठी ६ जुलै २०२६ पर्यंत पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी मुंबई यांनी केले आहे.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत प्रवेश देण्यात येतो. या योजनेसाठी २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली व इयत्ता २ री मध्ये प्रवेश घेण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावे व पाडे येथील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ६ जुलै २०२६ पर्यंत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, मुंबई या कार्यालयास अर्ज करणे आवश्यक असल्याचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांनी कळविले आहे.

# शिवाजीनगर पोलिसांची कारवाई; ०५ गुन्ह्यांची उकल करून २ लाख १० हजार रुपयांच्या सहा मोटारसायकली जप्त, एक आरोपी जेरबंद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील वाहनचोरीच्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने वाहनचोरीच्या पाच गुन्ह्यांची यशस्वी उकल केली आहे. या कारवाईत सतीश सुभाष कदम (वय ३४ वर्षे, रा. चनई, ता. अंबाजोगाई, जि. बीड) यास ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून २ लाख १० हजार रुपये किंमतीच्या सहा मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

लातूर शहर व परिसरात घडलेल्या वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना शिवाजीनगर पोलिसांना आरोपीबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली. पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तात्काळ हालचाली करून संशयित आरोपीचा शोध घेत त्यास ताब्यात घेतले. आरोपीची कसून चौकशी केल्यानंतर वाहनचोरीच्या अनेक गुन्ह्यांबाबत महत्त्वपूर्ण माहिती समोर आली.

तपासादरम्यान आरोपीकडून शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील दोन, गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीतील दोन, लातूर ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील एक तसेच आंध्र प्रदेश राज्यातील एक अशा एकूण पाच गुन्ह्यांमधील सहा मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या. जप्त वाहनांची एकूण किंमत अंदाजे २ लाख १० हजार रुपये आहे.

या कारवाईमुळे विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या वाहनचोरीच्या गुन्ह्यांची उकल होण्यास मदत झाली आहे. आरोपीकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याने त्याच्याकडे सखोल चौकशी सुरू आहे.




सदर कारवाई समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांचे मार्गदर्शनात संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे यांच्या नेतृत्वात सहाय्यक फौजदार संजय फुलारी, पोलीस अंमलदार राहुल सोनकांबळे, बालाजी कोतवाड, प्रशांत ओगले, किशोर माने, परमेश्र्वर अंकुलगे आणि नारायण शिंदे यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.